**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८.**

**मा.क प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक- ४**

**स भा वृ त्तां त**

**दिनांक ०१-६-२०१६** **वेळ-सकाळी ११.३० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यामा. "क" प्रभाग समिती मासिक सभा बुधवार दि.१/०६/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.शितोळे शैलजा बाबुराव सभापती
२) मा.सावळे सिमा रविंद्र
३) मा.पालांडे सुजाता सुनिल
४) मा. सौ. पानसरे अमिना महम्मंद
५) मा.गिता सुशिल मंचरकर
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
८) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
९) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०) मा.शेंडगे आशा सुखदेव
११) मा.मोटे किरण बाळासाहेब
१२) मा.संजय केशवराव काटे
१३) मा.सतिश सदाशिव काटे स्विकृत सदस्य
१४) मा.गणेश आनंदराव ढोरे स्विकृत सदस्य
१५) मा.हमीद नवाब शेख स्विकृत सदस्य

याशिवाय मा.मिनानाथ दंडवते- सहा.आयुक्त आरोग्य,मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.बी.बी.कांबळे-सहा.आरोग्याधिकारी, मा.पोरेड्डी- उपअभियंता, मा.शशिकांत दवंडे- उपअभियंता पापु, मा.उगले-लेखाधिकारी, श्री.शेख- कनिष्ठ अभियंता पापु, श्री.रमेश भोसले- मुख्य आरोग्य निरीक्षक हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

-------

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक १) नामकरण करणेबाबत-मा.सुषमा तनपुरे, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-२) वाचनालय काढून टाकणेबाबत- मा. रमा ओव्हाळ,मा. सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-३)टु व्हिलर /फोर व्हिलर साठी भूयारी मार्ग करणेबाबत- मा.गीता मंचरकर,मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) पावसाळयापुर्वी व स्वच्छतेबाबत कामे मुदतीमध्ये करुन घेणेबाबत- मा.सुजाता पालांडे,मा.सुषमा तनपुरे,मा.अमिना पानसरे,मा.किरण मोटे,मा.संजय काटे,मा.हमीद शेख, मा.गणेश ढोरे,मा.गीता मंचरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) प्रभाग क्र.४१ गांधीनगर येथे नव्याने होत असलेल्या सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन व मध्यवर्ती ग्रंथालयामध्ये बचतगटासाठी जागा मिळणेबाबत- मा.गीता मंचरकर, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ६) प्रभाग क्र.६१ दापोडीमधील स्मशानभूमी कमानीस नांव देण्याबाबत- मा.रोहितअप्पा काटे,मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

-------

अ) दिनांक ३०/४/२०१६ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ४/५/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक- १७६ विषय क्रमांक- १
दिनांक-०१/६/२०१६ विभाग-
सुचक- मा. सुषमा तनपुरे अनुमोदक-मा.रमा ओव्हाळ
संदर्भ- मा. सुषमा तनपुरे, मा. रमा ओव्हाळ,यांचा प्रस्ताव.

मधुबन प्रभाग क्र. ५९ सांगवी पुणे २७ येथील स.नं. ९ मध्ये गजानन महाराज मंदीर समोर मनपाच्या वतीने नवीन १६ लाख लिटर क्षमतेचा पिण्याच्या पाण्याचा जलकुंभ बांधण्यात आला आहे त्यांस **"स्व.कृष्णाबाई ओंकार ढोरे जलकुंभ"** असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १७७ विषय क्रमांक- २
दिनांक-०१/६/२०१६ विभाग-
सुचक- मा. रमा ओव्हाळ अनुमोदक-मा. सुषमा तनपुरे
संदर्भ- मा. रमा ओव्हाळ, मा. सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६१ दापोडी,मयुरवाटिका इमारतीच्या कंपाऊंडजवळ रस्त्याच्या कडेला मनपातर्फे यापुर्वी वाचनालय बसविणेत आले होते. सदर वाचनालय जुने असलेमुळे नादुरुस्त झाले आहे. त्यामुळे वाचनालयाचा नागरिक वापर करीत नाहीत. सदर वाचनालयाचा टवाळखोर मुलांकडुन गैरवापर होत असलेमुळे तेथील महिला व नागरिकांना असुरक्षिततेचे वातावरण तयार झाले आहे. तरी सदर वाचनालय जुने व खराब झाले असलेमुळे व नागरिकांचा वापर होत नसलेमुळे ताबडतोब निष्कासित करणेत यावे तसेच वाचनालयाजवळील गेली २ ते ३ वर्ष बंद असणारी फुटपाथवरील पानटपरी नागरिकांना फुटपाथ वरुन चालण्यास गैरसोय होत असलेमुळे काढुन टाकणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १७८ विषय क्रमांक- ३
दिनांक-०१/६/२०१६ विभाग-
सुचक- मा. गीता मंचरकर अनुमोदक-मा. सुजाता पालांडे
संदर्भ- मा. गीता मंचरकर, मा. सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

पिंपरी येथील एच.ए.कंपनीपासून पिंपरी कॅम्प् येथे जाण्या-येण्यासाठी मनपाच्या वतीने रेल्वे रुळाखालून नवीन भूयारी मार्ग सुरु केलेला आहे या भूयारी मार्गाचा उपयोग पिंपरी कॅम्पातील २५-३० हजार व खराळवाडी,गांधीनगर येथील ३०-४० हजार नागरिकांना होत आहे. याच ठिकाणी खराळवाडी येथे पुणे-मुंबई रस्त्यांवर पादचा-यांसाठी पादचारी पूल तयार केलेला आहे.परंतू या पादचारी पुलावर मदयपी दारु पिण्यास बसतात,तर काही लोक जुगार खेळत बसलेले असतात त्यांच्या त्रासामुळे या पुलाचा उपयोग महिलांकडुन तसेच नागरिकांकडुन केला जात नाही. तसेच या पादचारी पुलाची उंची ज्‍यास्त असल्याने अपंग व वृध्द नागरिक ही या पुलाचा उपयोग करीत नाहीत. तरी वॉर्ड क्र.४१ मधील नागरिकांची मागणी विचारात घेऊन टू व्हिलर/ फोर व्हिलरसाठी भूयारी मार्ग करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- १७९ विषय क्रमांक- ४

दिनांक-०१/६/२०१६ विभाग-

सुचक- मा. सुजाता पालांडे अनुमोदक-मा. सुषमा तनपुरे

संदर्भ- मा. मा.सुजाता पालांडे,मा.सुषमा तनपुरे,मा.अमिना पानसरे,मा.किरण मोटे, मा.संजय काटे,मा.हमीद शेख, मा.गणेश ढोरे,मा.गीता मंचरकर यांचा प्रस्ताव.

क क्षेत्रातील प्रभागा अंतर्गत सर्व वॉर्डामध्ये पावसाळयापुर्वी करावयाची कामे व स्वच्छतेची कामे त्वरीत करणेसाठी आवश्यकतेनुसार वाढीव कर्मचारी नेमुन मुदतीमध्ये कामे करुन घ्यावीत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- १८० विषय क्रमांक- ५

दिनांक-०१/६/२०१६ विभाग-

सुचक- मा. गीता मंचरकर अनुमोदक-मा. सुषमा तनपुरे

संदर्भ- मा.सुषमा तनपुरे, मा.गीता मंचरकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.४१ गांधीनगर येथे नव्याने सावित्रीबाई फुले स्मारक (सांस्कृतिक भवन) व लायब्ररी इमारत तयार होत आहे. सदर इमारतीमध्ये महिलांसाठी विविध स्वयंरोजगार शिक्षणाचे उपक्रम घेणेकामी गिता महिला बचत गट यांचेसाठी सुमारे दोनशे चौ. फुटाची जागा (हॉल सुविधा) महानगरपालिकेतर्फे उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १८१ विषय क्रमांक- ६

दिनांक-०१/६/२०१६ विभाग-

सुचक- मा. रोहितआप्पा काटे अनुमोदक-मा. रमा ओव्हाळ

संदर्भ- मा. रोहितआप्पा काटे , मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

मौजे दापोडी येथील प्रभाग क्र.६१ दापोडी स्मशानभूमी कमानीस **"कै.लक्ष्मण रामचंद्र काटे"** प्रवेशद्वार असे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

सही/-

(**मा.शितोळे शैलजा बाबुराव**)

सभापती

क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६.

क्र-कक्षेका/कावि/ ८० /२०१६.



दिनांक- २१/०६/२०१६.

प्रशासन अधिकारी

तथा सचिव सभाशाखा

क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.